पातूर नगरपरिषदेच्या संपूर्ण नगरपरिषदेची तसेच पिंपळनेर, मनमाड, गेवराई व अकोट नगरपरिषद यातील प्रत्येकी एका प्रभागातील रिक्त पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आणि राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमधील रिक्त पदाच्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम-२०२६.

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

ई-मेलद्वारे

क्र.रानिआ/नपनपं २०२६/ प्र.क्र.८/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०७/०५/२०२६

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)

विषय :- पातूर नगरपरिषद (जि.अकोला) संपूर्ण नगरपरिषद तसेच पिंपळनेर नगरपरिषद (जि.धुळे), मनमाड नगरपरिषद (जि.नाशिक), गेवराई नगरपरिषद (जि.बीड), व अकोट नगरपरिषद (जि.अकोला) यातील प्रत्येकी एका प्रभागातील रिक्त पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आणि राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमधील रिक्त पदाच्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम- २०२६.

संदर्भ :-१) नगरविकास विभागाचे एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१०/०६/२०२५, दि.१२/०६/२०२५ व दि.१४/०८/२०२५ अन्वये प्रभाग रचना कार्यक्रम.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.११/का-६, दि.०३/१०/२०२५ आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम.
३) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.१०/का-६ दि.३०/०९/२०२५ चे मतदार यादी कार्यक्रम व सुधारीत दि.१३/१०/२०२५ व क्र.रानिआ/नप-२०२६/प्र.क्र.१/का-६, दि.११/०२/२०२६.
४) नगरविकास विभाग क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.४०९/नवि-१४, दि.०६/१०/२०२५ रोजीचे नगराध्यक्ष आरक्षणाबाबतचे पत्र.
५) या कार्यालयाचे क्र.रानिआ-२०२५/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का-६ दि.०४/११/२०२५ रोजीचा निवडणूक कार्यक्रम व दि.२९/११/२०२५ रोजीचा सुधारित निवडणूक कार्यक्रम.
६) आयोगाचे क्र.रानिआ- नप २०२५/प्र.क्र.१४/का-६ चे जिल्हाधिकारी धुळे, नाशिक बीड व नि.नि.अ.अकोट यांना पाठविलेले पत्र अनुक्रमे दि.२६/११/२०२५ व दि.१/१२/२०२५.
७) जिल्हाधिकारी अकोला यांचे क्र.कक्ष-६/नपाप्र/निवडणूक/कावि-१६८/२०२५, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार व अधीन राहून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ५१अ-१अ नुसार नगरपरिषदा व ३४१ब-१अ नुसार नगरपंचायतींच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुका थेट निवड पध्दतीने करण्याबाबतची तरतुद केली आहे. तसेच याच अधिनियमातील कलम ५२ नुसार नगरपरिषदा व ३४१ब-४ नुसार नगरपंचायतींच्या यापुढील निवडणुकांकरिता नगराध्यक्ष पदाची मुदत पाच वर्ष इतकी केली आहे. त्याअनुषंगाने नगरविकास विभागाने संदर्भाधीन क्र.४ च्या पत्राच्या अन्वये दि.०६/१०/२०२५ रोजी अध्यक्ष आरक्षण सोडत पध्दतीने निश्चित केले आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाचे अनुषंगाने राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका खालील प्रक्रियेनुसार संपन्न झाल्या आहेत.

I) नगर विकास विभागाच्या संदर्भ क्र.१ च्या पत्रानुसार प्रभागरचनेचा कालबद्ध कार्यक्रम पूर्ण झालेला आहे.

II) आयोगाच्या दि.०३/१०/२०२५ च्या पत्रान्वये आरक्षण सोडत कार्यक्रम संपन्न झालेला आहे.

III) आयोगाच्या दि.३०/०९/२०२५ व दि.१३/१०/२०२५ च्या पत्रान्वये मतदारयादीचा कार्यक्रम पार पडलेला आहे.

IV) आयोगाच्या संदर्भीय क्र.५ च्या दि.०४/११/२०२५ निवडणूक कार्यक्रम व दि.२९/११/२०२५ रोजीच्या सुधारीत निवडणक कार्यक्रमानुसार सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या आहेत.

या नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची कार्यवाही सुरू असतांना पिंपळनेर (जि.धुळे), मनमाड (जि.नाशिक), गेवराई (जि.बीड), व अकोट (जि.अकोला) या ४ नगरपरिषदांमध्ये, सोबत जोडलेल्या परिशिष्ट २ मध्ये नमूद प्रभागातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे निधन झाले व त्यामुळे संदर्भ क्र. ६ नुसार संबंधित प्रभागाची निवडणूक (अध्यक्ष पदाची निवडणूक वगळून) स्थगित करण्यात आली. तसेच पातूर नगरपरिषदेची (जि.अकोला) प्रभाग रचना विहीत वेळेत पूर्ण न झाल्याने या नगरपरिषदेकरिता नव्याने निवडणूक कार्यक्रम देणे क्रमप्राप्त झाले आहे. यांचा तपशिल या पत्रासोबतचे सहपत्र परिशिष्ट २ मधील २अ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, पातूर नगरपरिषदेची संपूर्ण नगरपरिषदेकरिता सार्वत्रिक निवडणूक तसेच पिंपळनेर, मनमाड, गेवराई व अकोट नगरपरिषदेच्या संबंधित प्रभागाच्या सार्वत्रिक निवडणुकीचा तसेच ११ जिल्ह्यातील १४ नगरपंचायतींच्या १५ रिक्त पदांकरिता व ३ नगरपरिषदेच्या ३ रिक्त पदांकरिता पोट निवडणूक कार्यक्रम राबविण्यात यावा असे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे. या निवडणुका मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०६/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

आदेश :-

१. राज्यातील नगरपरिषदांपैकी निवडणूक घेण्यास पात्र असलेल्या पातूर (जि.अकोला) या संपूर्ण नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक (अध्यक्ष व सदस्य या पदासह), ४ नगर परिषदांच्या यापूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे निधन झाल्यामुळे स्थगित कराव्या लागलेल्या त्या त्या प्रभागाची सार्वत्रिक निवडणूक तसेच इतर नगर परिषद आणि नगर पंचायतींमध्ये विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांसाठी पोट निवडणूक परिशिष्ट १ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यात यावी. तसेच ज्या नगरपरिषद आणि नगर पंचायतींच्या सार्वत्रिक /पोट निवडणूक घ्यावयाच्या आहेत त्यांचा तपशील परिशिष्ट २ (२अ व २ब) मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

२. राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९अ व ३४१ब नुसार सदस्यांसाठी तसेच ५१-१ब व ३४१ब अन्वये अध्यक्षांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि, जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा जात पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. यासंदर्भात राज्य शासनाच्या सन २०२५ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दि. ०३ नोव्हेंबर, २०२५ अन्वये उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. याबाबत उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहीत केलेले हमीपत्र घेण्यात यावे.

३. परिशिष्ट २ मध्ये नमूद करण्यात आलेली ही सर्व पदे रिक्त असल्याची पुनश्च: खातरजमा करण्यात यावी.

४. परिशिष्ट-१ येथील निवडणूक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

५. या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे पारंपारिक पध्दतीने स्वीकारण्यात यावीत.

६. निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम निर्गमित केलेल्या वेळेपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणुकांकरिता पातूर नगर परिषदेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी व इतर निवडणुकांच्याबाबत संबंधित प्रभागास लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही कृती/ घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

७. सार्वत्रिक व पोट निवडणूक असलेल्या नगरपरिषदेच्या प्रभाग रचना, आरक्षण व सोडत, मतदार यादी, अपात्रता इत्यादी संदर्भात मा. न्यायालय किंवा सक्षम प्राधिकरण यांचेकडे याचिका/अपील दाखल झाले असल्यास व त्यामध्ये मा. न्यायालयाचे /सक्षम प्राधिकरणाचे स्थगिती आदेशाबाबत खातरजमा करण्याची तसेच मा. न्यायालय/सक्षम प्राधिकरणाच्या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच निवडणुकां संबंधित दाखल याचिकांमध्ये

मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द/ स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

८. मतदारांच्या जनजागृती व तत्सम बाबीसाठी नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी. उमेदवारांनी निवडणूक खर्च आयोगाच्या दि.१५/२/२०२४,दि.२९/१०/२०२५ रोजीच्या आदेशानुसार सादर करावयाचा आहे.

९. सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे:-

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | : https://mahasecelec.in/ |
| दूरध्वनी क्रमांक (नगरपालिका शाखा) | : २२८४६७२१ |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | : २२८८६९५० |
| ई-मेल | : sec.council@mah.gov.in / sec.compu@mah.gov.in |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

०६.०४.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, सर्व
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
१०) संबंधित नगर परिषदांचे मुख्याधिकारी/प्रशासक
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
१३) स.आ. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.

# परिशिष्ट – १

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नपनपं २०२६/ प्र.क्र.८/का-६, दि.७/५/२०२६सोबतचे सहपत्र)

सोबतच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतींमधील रिक्त पदांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम २०२६

| अ.क्र | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्याचा दिनांक | दि.३१/१०/२०२५, दि.२१/११/२०२५ व दि.०६/०३/२०२६ |
| २ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | दि.१२/०५/२०२६ (मंगळवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि.१८/०५/२०२६ (सोमवार) ते दि.२५/०५/२०२६ (सोमवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० कालावधीत) ( दि.२३/५/२०२६ शनिवार व दि.२४/५/२०२६ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२६/०५/२०२६ (मंगळवार) सकाळी ११.०० वाजेपासुन |
| ५-अ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा कालावधी अपील नसेल तेथे | दि.२७/०५/२०२६ (बुधवार) ते दि.०२/०६/२०२६ (मंगळवार) सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत (दि.२८/५/२०२६ गुरुवार,दि.३०/५/२०२६ शनिवार व दि.३१/५/२०२६ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे मागे घेता येणार नाहीत) |
| ५-ब | अपील असल्यास<br>वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी *.<br>कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० कालावधीत. मात्र दि.११/०६/२०२६ (गुरुवार) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत. |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | अपील नसेल तेथे: दि.०२/०६/२०२६ (मंगळवार) रोजी दुपारी ०३.०० वाजे नंतर<br>अपील असल्यास : दि.११/०६/२०२६ (गुरुवार) रोजी दुपारी ०३.०० वाजे नंतर |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि.२०/०६/२०२६ (शनिवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत. |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि.२१/०६/२०२६ (रविवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ०९ | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि.२३/०६/२०२६ (मंगळवार) कलम १९ मधील तरतुदीनुसार |

* निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. अपिलाचा निर्णय दि.०८/६/२०२६ (सोमवार)पर्यंत लागला नसल्यास संबंधित उमेदवारास चिन्ह वाटप करु नये व आयोगाकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा. तदनंतर त्यासंदर्भात स्वतंत्र सूचना देण्यात येतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

०७.०५.२०२६

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट - २

## २ अ : सार्वत्रिक निवडणुका : नगरपरिषदांच्या रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र | जिल्हा | नगरपरिषदेचे नाव | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | धुळे | पिंपळनेर नगरपरिषद | प्रभाग क्र.२ (जागा २) |
| २ | नाशिक | मनमाड नगरपरिषद | प्रभाग क्र.१० (जागा २) |
| ३ | बीड | गेवराई नगरपरिषद | प्रभाग क्र.११ (जागा २) |
| ४ | अकोला | अकोट नगरपरिषद | प्रभाग क्र.४ (जागा २) |
| ५ | | पातूर नगरपरिषद | संपूर्ण नगरपरिषद (१ अध्यक्ष + २० सदस्य) |
| २ अ = एकूण जिल्हे-४, नगरपरिषद संख्या -५, रिक्त पदे - २९ | | | |

## २ ब : पोट निवडणुका : नगरपरिषद /नगरपंचायतीच्या रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा | नप/ नपं नाव | नप/ नपं | प्रभाग व जागा क्रमांक | पद रिक्त होण्याचे कारण | पद रिक्त झाल्याचा दिनांक | मुदत संमाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | रायगड | पाली | नगरपंचायत | १३ | अनर्ह | ०२-०७-२०२५ | ०९-०२-२०२७ |
| २ | | | नगरपंचायत | १४ | अनर्ह | ०२-०७-२०२५ | ०९-०२-२०२७ |
| ३ | | पोलादपूर | नगरपंचायत | १ | राजीनामा | १३-०५-२०२५ | ०९-०२-२०२७ |
| ४ | नाशिक | देवळा | नगरपंचायत | १३ | राजीनामा | २६-०८-२०२४ | १४-०२-२०२७ |
| ५ | | पेठ | नगरपंचायत | १६ | अनर्ह | २४-०६-२०२५ | १४-०२-२०२७ |
| ६ | जळगाव | एरंडोल | नगरपरिषद | ९ब | मृत्यू | १०-०३-२०२६ | २०-०१-२०३१ |
| ७ | जालना | तीर्थपुरी | नगरपंचायत | १२ | मृत्यु | ११-०६-२०२४ | १५-०२-२०२७ |
| ८ | | घनसावंगी | नगरपंचायत | १२ | मृत्यु | २५-११-२०२५ | १५-०२-२०२७ |
| ९ | लातूर | अहमदपूर | नगरपरिषद | २अ | मृत्यु | १३-०१-२०२६ | १९-१२-२०३० |
| १० | वाशिम | मानोरा | नगरपंचायत | १४ | मृत्यु | ०७-१०-२०२४ | १८-०१-२०२७ |
| ११ | नागपूर | हिंगणा | नगरपंचायत | १० | मृत्यु | ०२-१०-२०२४ | १५-०२-२०२७ |
| १२ | चंद्रपूर | जिवती | नगरपंचायत | ७ | अनर्ह | १०-०९-२०२४ | १६-०२-२०२७ |
| १३ | | सावली | नगरपंचायत | १६ | राजीनामा | ०८-०९-२०२५ | १६-०२-२०२७ |
| १४ | गडचिरोली | गडचिरोली | नगरपरिषद | ९अ | मृत्यू | २७-०२-२०२६ | २०-०१-२०३१ |
| १५ | | कुरखेडा | नगरपंचायत | १६ | मृत्यु | ०३-०४-२०२४ | १३-०२-२०२७ |
| १६ | | अहेरी | नगरपंचायत | ९ | मृत्यु | २३-०८-२०२५ | १५-०२-२०२७ |
| १७ | गोंदिया | सडक अर्जुनी | नगरपंचायत | ११ | मृत्यु | १६-०५-२०२४ | १५-०२-२०२७ |
| १८ | वर्धा | समुद्रपूर | नगरपंचायत | १६ | मृत्यु | २४-१२-२०२५ | १४-०२-२०२७ |
| २ ब = एकूण जिल्हे ११,नगरपरिषद संख्या ३ (रिक्त पदे -३); नगरपंचायती संख्या १४ (रिक्त पदे -१५), एकूण नप/ नपं रिक्त पदे -१८ | | | | | | | |
| गोषवारा २अ+२ब= एकूण जिल्हे-१४,नगर परिषद संख्या-८,नगरपंचायत संख्या-१४, रिक्त पदे - ४७ | | | | | | | |

(signature)



०७.०५.२०२६